अपना बँक
अपना सहकारी बँक लि.
APNA SAHAKARI BANK LTD.
आपली माणसं... आपली बँक
Multi State Scheduled Bank

# अपना सहकारी बँक लि.

**(मल्टिस्टेट शेड्युल्ड बँक)**


मल्टिस्टेट नोंदणी क्र.DMSCS/CR/816/2013 दि.२९ एप्रिल २०१३. ● नोंदणी क्रमांक :बी. ओ. एम. बी. एन. के. १०७ सन १९६८


नोंदणी कार्यालय : १०६ -ए,गोविंदजी केणी रोड, नायगांव, मुंबई -४०० ०१४. ● कॉर्पोरेट ऑफिस : अपना बँक भवन, डॉ. एस.एस.राव रोड, परेल, मुंबई -४०० ०१२.
दूरध्वनी :२४१६४८६०/२४१०४८६१/२४१०४८६२/२४११४८६३ ● फॅक्स : २४१०४६८०
email :corporateoffice@apnabank.co.in ● website :www.apnabank.co.in


## : ५३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना :

### (फक्त सभासदांकरीता )

अपना सहकारी बँक लि.च्या सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, बँकेची **त्रेपन्नावी वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार, दिनांक २६ डिसेंबर २०२० रोजी सकाळी ११.००** वाजता सुरु होईल. कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांच्या दि.२५/०८/२०२० रोजीच्या परिपत्रकातील निर्देशानुसार सदर सभा **दिनांक २६ डिसेंबर २०२० ते ३० डिसेंबर २०२० या दरम्यान ५ दिवस होईल.** सदर सभा व्हिडीओ कॉन्फरन्सिंग/अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (OAVM) द्वारे आयोजित करण्यात आली आहे. सभा ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक नाही. त्यामुळे बँकेचे कॉर्पोरेट ऑफिस, अपना बँक भवन, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई - ४०० ०१२ हे सभास्थान मानण्यात येईल.

**: कामकाजाची विषय सूची :**

१. दिनांक २९ सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांताचे वाचन करणे.
२. अध्यक्षीय भाषण.
३. दिनांक ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या बँकेच्या ५३व्या वार्षिक अहवालातील वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले नफा-तोटा पत्रक, ताळेबंद आणि संचालक मंडळाचा अहवाल स्वीकृत करणे.
४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नक्त नफ्याच्या विभागणीस मंजूरी देणे.
५. सन २०१९-२० च्या वैधानिक लेखा परिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.
६. सन २०१९-२० च्या वैधानिक लेखा परिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालावर विचार करून तो स्वीकृत करणे.
७. सन २०२०-२१ करिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून संचालक मंडळाने शिफारस केलेल्या मे. संजय राणे ॲन्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकाऊंटंटस्, मुंबई यांच्या नेमणुकीस मान्यता देणे व त्यांचे मानधन ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.
८. पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.
९. वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या रजेला पोटनियम क्रमांक 8(a)(ii) नुसार मान्यता देणे.
१०. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

**परेल, मुंबई - ४०० ०१२**
दिनांक : २६.११.२०२०

**राजन हों बाळकर**
**(मुख्य कार्यकारी अधिकारी)**

**सूचना :** गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा ऑनलाईन पध्दतीने त्याचदिवशी सकाळी ११.३० वाजता घेण्यात येईल व पोटनियम क्र. 29 (iii) नुसार त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

**: महत्त्वाच्या सूचना :**

१. व्हिडीओ कॉन्फरन्सिंग/अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (OAVM) द्वारे ५ दिवस होणाऱ्या सभेबाबत विस्तृत माहिती/सूचना तसेच वार्षिक नफा तोटा पत्रक, ताळेबंदाबाबत माहिती बँकेच्या https://apnabank.co.in या संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध होईल.
२. सभासदांना वार्षिक नफा-तोटा पत्रक, ताळेबंदाबाबत माहिती विचारावयाची असल्यास दि. १४ डिसेंबर २०२० पासून १७ डिसेंबर २०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत members@apnabank.co.in या ई-मेलवर लेखी स्वरुपात विचारावी.
३. सन २०१९-२०चा वार्षिक अहवाल नोंदणीकृत कार्यालय, कॉर्पोरेट ऑफिस व शाखांमध्ये दि. ११ डिसेंबर २०२० पासून उपलब्ध राहील.
४. सर्व सभासदांस सूचित करण्यात येते की, त्यांच्या पत्त्यातील बदल किंवा नवीन पत्ता बँकेच्या शेअर विभागात देण्यात यावा.